आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

१८जानेवारी २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- स्वामित्व योजनेअंतर्गत दिली जाणारी ई प्रॉपर्टी कार्ड हा केवळ दस्तऐवज नसून आर्थिक सुरक्षेची हमी असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- गड किल्ल्यांवरचं अतिक्रमण काढण्यासाठी आणि रोखण्यासाठी जिल्हास्तरीय समिती स्थापन

- मुंबईत विविध सार्वजनिक वाहतूक व्यवस्थांसाठी एकच तिकीट वापरता येणार

**आणि**

- खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघाची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

स्वामित्व योजनेअंतर्गत दिली जाणारी ई प्रॉपर्टी कार्ड हा केवळ दस्तऐवज नसून आर्थिक सुरक्षेची हमी असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं. स्वामित्व योजनेअंतर्गत गाव पातळीवर जमिनीच्या मालकी हक्कांविषयी संपूर्ण माहिती देणाऱ्या ई प्रॉपर्टी कार्डाचं वितरण आज प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. स्वामित्व आणि भू आधार या दोन्ही योजना ग्रामीण भारताच्या विकासाचा आधार आहेत, असंही ते म्हणाले. छोट्या गावांना स्वामित्व योजनेच्या होणाऱ्या लाभाबद्दल बोलताना प्रधानमंत्री म्हणाले…

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री (१९ सेकंद)**

या कार्यक्रमात देशभरातली दहा राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या पन्नास हजाराहून अधिक गावांतली ६५ लाख ई-प्रॉपर्टी कार्डस् प्रधानमंत्र्यांच्या हस्ते वितरित करण्यात आली. यावेळी प्रधानमंत्र्यांनी ठिकठिकाणच्या लाभार्थ्यांशी

दूरस्थ पद्धतीने संवाद साधला. नागपुरातल्या रोशन पाटील या शेतकऱ्याशी बोलताना प्रधानमंत्री म्हणाले...

**होल्ड बाईट - प्रधानमंत्री (४४ सेकंद)**

जमीन मालकाला त्याच्या जमिनीची कायदेशीर सनद मिळवून देणं हा या योजनेचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ३ लाख १७ हजार गावांमध्ये ड्रोन सर्वेक्षण पूर्ण झालं झालं आहे. दीड लाखांपेक्षा जास्त गावांसाठी सव्वा दोन कोटी प्रॉपर्टी कार्ड्स तयार करण्यात आली आहेत. महाराष्ट्रातल्या १५ हजार गावांमध्ये या कार्डांचं वाटप होणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी नागपुरात प्रसारमाध्यमांशी बोलताना दिली. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर, भंडारा, धुळे या जिल्ह्यांत प्रॉपर्टी कार्डसच्या वितरणाला सुरुवात झाली आहे.

**<><><><><>**

संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या ३१ जानेवारीपासून सुरू होत आहे. दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीसमोर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणानं अधिवेशनाला प्रारंभ होईल. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन एक फेब्रुवारी रोजी केंद्रीय अर्थसंकल्प सादर करणार आहेत. हा त्यांचा सलग ८वा अर्थसंकल्प असून तो एक विक्रम आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशनाचा पहिला टप्पा १३ फेब्रुवारी पर्यंत चालेल, त्यात ९ बैठका होतील. यादरम्यान प्रधानमंत्री नरेंद्र मोदी राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रस्तावावर चर्चेला आणि अर्थमंत्री सीतारामन अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देतील.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून देशविदेशातल्या श्रोत्यांशी संवाद साधणार आहेत.  हा या कार्यक्रमाचा एकशे अठरावा (११८) भाग आहे.

हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या तसंच आकाशवाणीचं संकेतस्थळ आणि न्यूज ऑन एआयआर या मोबाईल ॲप वरून प्रसारित केला जाणार आहे. त्याशिवाय हा कार्यक्रम एआयआर न्यूज, डीडी  न्यूज, प्रधानमंत्री कार्यलय तसंच माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या युट्युब वाहिनीवरून थेट प्रसारित केला जाणार आहे.

**<><><><><>**

कोलकात्यातल्या आर जी कार रुग्णालयातल्या बलात्कार आणि हत्या प्रकरणी सिएलदा न्यायालयानं आरोपी संजय रॉयला दोषी ठरवलं आहे. त्याच्या शिक्षेबद्दलचा आदेश येत्या सोमवारी न्यायालय जाहीर करील. गेल्या ऑगस्ट महिन्यात या वैद्यकीय महाविद्यालयात ३१ वर्षीय प्रशिक्षणार्थीवर बलात्कार करुन तिची हत्या झाली होती.

**<><><><><>**

गड किल्ल्यांवरील अतिक्रमण काढण्यासाठी आणि रोखण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हास्तरीय समिती गठित केल्याची माहिती महाराष्ट्राचे सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार  यांनी आज  दिली. ते मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. राज्यातले किल्ले आणि गडावर अतिक्रमण होत असल्याचं सरकारच्या निदर्शनास आलं होतं. त्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार ही समिती गठित करण्यात आली आहे. या समितीत पोलीस आयुक्त, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा पोलीस अधीक्षक, महानगरपालिका आयुक्त, मुख्याधिकारी, वनक्षेत्र असेल तिथे उप वनसंरक्षक, भारतीय पुरातत्व भारत सरकार, यांचा समावेश असेल.

**<><><><><>**

मुंबईकरांना लवकरच एकाच तिकिटावर उपनगरी रेल्वे, बेस्ट बस, मेट्रो, मोनो आणि एसटीने प्रवास करता येणार आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्याशी चर्चा केल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत ही माहिती दिली.

**होल्ड... बाईटः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या ॲप्लिकेशनवर लोकांना आपल्या प्रवासाची आखणी करता येईल, तसंच सर्वात जवळचं स्थानक आणि प्रवासाच्या साधनाची माहितीही आर्टिफिशल इंटेलिजन्सद्वारे त्यांना मिळू शकेल. या मंचाद्वारे लाखो मुंबईकरांचा प्रवास सुकर होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आरोग्य क्षेत्रात क्रांती घडणार आहे, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. वांद्रे कुर्ला संकुलातील जिओ कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित ‘पॅन आयआयटी वर्ल्ड ऑफ टेक्नॉलॉजी २०२५’ परिषदेच्या उद्घाटन सत्रात ते आज बोलत होते. ग्रामीण आणि दुर्गम भागात डॉक्टरांना पोहोचणं शक्य नसतं तिथले रुग्ण तंत्रज्ञानाच्या माध्यमातून डॉक्टरांपर्यंत पोहोचू शकणार आहेत, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मुंबईतल्या केईएम अर्थात सेठ गोवर्धनदास सुंदरदास वैद्यकीय महाविद्यालय आणि राजे एडवर्ड स्मारक रुग्णालयाचा शताब्दी वर्षाच्या विविध कार्यक्रमांची सुरुवात झाली. गेल्या १०० वर्षात संस्थेसाठी समर्पणवृत्तीने काम करणाऱ्या लोकांचे त्यांनी आभार मानले.

**<><><><><>**

राज्यातल्या जवळपास ४ हजार अपात्र महिलांनी लाडकी बहीण योजने◌ेतून माघार घेतली असल्याची माहिती महिला आणि बाल कल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली आहे. गेल्या महिन्यात शंभर - दीडशे अर्ज आले होते. तर उर्वरित या महिन्यात आल्याचं तटकरे म्हणाल्या. या महिलांना परत केलेले पैसे विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरले जाणार आहेत. तक्रार प्राप्त झालेल्या लाभार्थ्यांच्या अर्जाची छाननी सुरू आहे. जानेवारी महिन्याचे पैसे लाभार्थ्यांना २६ जानेवारी पूर्वी दिले जातील, असंही त्यांनी सांगितलं.

<><><><>

नवी दिल्ली इथं सुरु असलेल्या खो-खो विश्वचषक स्पर्धेत भारतीय पुरुष आणि महिला संघानं उपांत्य फेरीत धडक मारली आहे. पुरुष संघानं श्रीलंका संघावर १००-४० अशी मात केली. रामजी कश्यप कालच्या सामन्याचा सर्वोत्तम खेळाडू ठरला तर व्ही सुब्रमणी उत्कृष्ट चढाईचा मानकरी ठरला. प्रियंका इंगळेच्या नेतृत्वाखालील महिला संघानं बांग्लादेश संघावर १०९-१६ असा विजय मिळवला. कालच्या सामन्यासाठी अश्विनी शिंदे सर्वोत्तम खेळाडू आणि ऋतुराणी सेन उत्कृष्ट बचाव खेळाडू ठरली.

<><><><>

महिला क्रिकेटमधे १९ वर्षांखालील  ट्वेंटी- ट्वेंटी विश्वकरंडक स्पर्धेला आजपासून मलेशिया इथं सुरूवात होत आहे. यामध्ये १९ संघ सहभागी होत आहेत. या संघाची चार गटात विभागणी केली असून, भारताच्या गटात मलेशिया, श्रीलंका, वेस्टइंडिज हे संघ आहेत. भारताचा पहिला गटसाखळी सामना उद्या वेस्टइंडिजबरोबर होणार आहे. आज सहा साखळी सामने होणार आहेत.

<><><><>

भारतीय खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत पुरुष दुहेरीच्या उपांत्य फेरीत भारताच्या चिराग शेट्टी आणि सात्विकराज रंकीरेड्डी यांचा सामना मलेशियाचे गो झे फेई आणि नूर इज्जुद्दीन यांच्याशी आज संध्याकाळी होणार आहे.

त्याआधी भारतीय जोड़ीनं दक्षिण कोरियाच्या जिन योंग आणि कांग मीन ह्युक यांचा उप उपांत्य फेरीत २१-१०, २१-१७ असा पराभव केला होता. दरम्यान, या स्पर्धेत इतर प्रकारातलं भारताचं आव्हान संपुष्टात आलं आहे.

//<><><><><>//